खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १७०, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०१ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सुनेत्रा पवार झाल्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

## राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास ही खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवली



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादीची धुरा कोणाकडे जाणार, उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी कोण सांभाळणार, या प्रश्नांचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी बैठकांचं सत्र सुरु आहे.

अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांच्या नावासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आग्रही आहेत. त्यामुळे सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होतील, अशी चर्चा सुरु आहे. या सगळ्या चर्चांवर, शक्यतांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच भाष्य केलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते असलेले प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दोनदा भेट घेतली. काल आणि आज ही नेते मंडळी फडणवीसांना भेटली. त्यानंतर सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होतील, या चर्चांना जोर धरला. अखेर फडणवीस यांनी या सगळ्यावर स्पष्ट शब्दांत भाष्य केलं. सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री होणार का, असा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर हा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून या संदर्भात निर्णय घेतला जाईल. आम्ही त्या निर्णयाच्या पाठीशी असू. आम्ही त्यांना या संदर्भात पाठिंबा देऊ, असं फडणवीस म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माझ्याशी दोन वेळा चर्चा करुन गेले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. 'त्यांनी मला त्यांच्या पक्षाची कार्यपद्धती सांगितली. त्यांच्याकडे असलेल्या पर्यायांची सविस्तर माहिती दिली. या संदर्भात अंतिम निर्णय त्यांचा पक्ष घेईल,' असं फडणवीस यांनी सांगितलं. दुसरीकडे उद्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची बैठक बोलावली जाण्याची शक्यता आहे. या बैठकीत विधिमंडळ गटनेता निवडला जाऊ शकतो. अजित पवार विधिमंडळ गटाचे नेते होते. त्यांच्याचकडे पक्षाची धुरादेखील होती. त्यामुळे आता राष्ट्रवादीचं नेतृत्व कोण करणार आणि उपमुख्यमंत्री कोण होणार, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

अजित पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालयाचा कार्यभार होता. त्यामुळे आता पुढील अर्थसंकल्प कोण सादर करणार, हा प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर अजित दादांनी अर्थसंकल्पाची बरीच तयारी करुन ठेवलेली आहे. उद्यापासून मी त्या प्रक्रियेत लक्ष घालेन. अर्थसंकल्प कोणी सादर करायचा, ते नंतर ठरवू, असं फडणवीस म्हणाले.

सुनेत्रा पवार राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अजित पवार यांचा बारामतीत विमान अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवार यांच्या अस्थी काल नीरा नदीत विसर्जित करण्यात आल्या. यानंतर रात्रीच्या सुमारास सुनेत्रा पवार त्यांचे पुत्र जय यांच्या सोबत मुंबईच्या दिशेनं रवाना झाल्या.

आज दुपारी दोनच्या सुमारास राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांची बैठक झाली. या बैठकीत मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. सुनेत्रा पवार यांना विधिमंडळ गटनेत्या करण्याचा प्रस्ताव एकमतानं मंजूर झाला. या प्रस्तावाला मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिलं. विधिमंडळ पक्षाचे सर्व घटनात्मक अधिकार आमदारांनी एकमुखानं सुनेत्रा पवार यांच्याकडे दिले. यानंतर आज संध्याकाळी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

शपथविधी सोहळ्यानंतर सुनेत्रा पवार बारामतीला रवाना होणार आहेत. पुढील १० दिवस त्या बारामतीत असणार आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी त्या मुंबईला आल्या होत्या. पुढील १० दिवस त्यांचा मुक्काम बारामतीतच असेल.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा पक्का निर्णय !




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, बारामती :** एकीकडे सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी आज मुंबईत होत असतानाच दुसरीकडे आपल्याला याविषयी माहिती नाही किंवा विश्वासात घेतलेलं नाही, असं सांगून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज सकाळी राज्याच्या राजकारणात खळबळ उडून दिली होती.

त्यानंतर विविध तर्क-वितर्क लढवले जात असताना पार्थ पवार हे शरद पवारांना भेटायला गेले. या दरम्यान झालेल्या बैठकीत काय तपशील होता, हे सुरुवातीला कळू शकले नाही. त्यानंतर पार्थ पवार हे काहीही न बोलता बैठकीतून निघून गेले. काही वेळानंतर आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार एकाच गाडीतून आले. मात्र तेदेखील काहीही न बोलता निघून गेले. परंतु त्यानंतर एक तासानंतर महत्त्वाची माहिती समोर आली असून पार्थ पवारांच्या भेटीने सर्व चित्र पालटलं असून पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि दिवंगत अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू अशी ओळख असलेल्या किरण गुजर यांनी दिली आहे.

किरण गुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्थ पवार यांनी आज शरद पवार यांच्यासह पवार कुटुंबाच्या घेतलेल्या भेटीत त्यांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण दिले. शपथविधी सोहळ्यावरून जे समज-गैरसमज झाले होते, ते दूर करण्यात आले आहेत आणि पवार कुटुंबाने राजकीदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, असा दावा गुजर यांनी केला आहे.

मी अजित पवार यांच्या सहयोग निवासस्थानी पार्थ पवार यांची भेट घेत तिथं त्यांच्याबरोबर चर्चा केली आणि त्यानंतर अजित पवार यांचे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचे स्वप्न कोणत्याही परिस्थितीत साकार करायचं, असं आम्ही ठरवलं आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणारच. या संदर्भात मी पार्थ यांच्याशी चर्चा केली आहे, अशी माहिती देखील किरण गुजर यांनी दिली आहे.

मी सकाळी जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, पार्थ पवार, युगेंद्र पवार, राजेंद्र पवार, रणजीत पवार यांच्या बरोबरील चर्चेत सहभागी होतो. तेथे चर्चा झाल्यानंतर मी पुन्हा नव्याने स्वतंत्रपणे सहयोग निवासस्थानी पार्थ पवार यांच्याशी चर्चा केली आणि त्यांनी कोणत्याही परिस्थितीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असे सांगितल्यानंतर मी माझी भूमिका मांडत आहे, असं किरण गुजर म्हणाले.

## मुंबईत मध्य आणि हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३१, मुंबई :** मुंबईकरांना रविवारचा दिवस म्हणजे लोकलने प्रवास करायचा असल्यास त्रासदायक ठरत असतो. कारण दर रविवारी मध्य आणि पश्चिम रेल्वेवर दुरुस्ती आणि देखभालीसाठी मेगाब्लॉक घेतला जातो. त्यामुळे लोकल उशीराने धावत असल्याने प्रवाशांना त्रासाचा सामना करावा लागतो.

या रविवारी म्हणजे आज देखील मुंबईकरांना रविवारी घरातून बाहेर पडताना मेगाब्लॉकचे टाईम टेबल पाहूनच निघावे लागणार आहे. कारण आज रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी मध्य रेल्वेच्या उपनगरीय मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे लोकलचे वेळापत्रक विस्कळीत असण्याची शक्यता आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई डिव्हीजनमध्ये अभियांत्रिकी आणि देखभाल दुरुस्ती कामांसाठी हा मेगाब्लॉक घेतला जाणार आहे.

मुख्य मार्गावर ठाणे ते कल्याण स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १०.४० ते दुपारी ०३.४० वाजेपर्यंत ब्लॉक संचालित राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून सकाळी ०९.३४ ते दुपारी ०३.०३ दरम्यान सुटणाऱ्या डाऊन जलद /अर्ध-जलद लोकल फेऱ्यांना ठाणे ते कल्याण दरम्यान डाऊन धीम्या मार्गावरून वळविण्यात येणार आहेत.

या लोकल फेऱ्या त्यांच्या नियोजित थांब्यांव्यतिरिक्त कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील, तसेच सुमारे १० मिनिटे उशिरा गंतव्यस्थानी पोहोचतील. कल्याण येथून सकाळी १०.२८ ते दुपारी ०३.४० दरम्यान सुटणाऱ्या अप जलद/ अर्ध-जलद लोकल फेऱ्या कल्याण ते ठाणे दरम्यान अप धीम्या मार्गावरून वळविण्यात येतील.या फेऱ्या त्यांच्या नियोजित थांब्या व्यतिरिक्त दिवा, मुंब्रा आणि कळवा स्थानकांवर थांबतील आणि पुढे मुलुंड स्थानकात अप जलद मार्गावर पुन्हा वळविण्यात येतील.या लोकल फेऱ्या सुमारे १० मिनिटे उशिरा गंतव्यस्थानी पोहोचतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई आणि दादर येथून सुटणाऱ्या डाऊन मेल- एक्सप्रेस गाड्या ठाणे ते कल्याण दरम्यान ५ व्या मार्गिकेवरून वळविण्यात येतील. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई आणि दादर येथे येणाऱ्या अप मेल-एक्सप्रेस गाड्या कल्याण ते ठाणे -विक्रोळी दरम्यान ६ व्या मार्गावरून वळविण्यात येतील.

**दरम्यान हार्बर मार्गावरील वाहतूक !**

मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर कुर्ला ते वाशी स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत ब्लॉक राहणार आहे. मुंबई,छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी १०.३४ वा.ते दुपारी ३.३६ वा.दरम्यान वाशी-बेलापूर -पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील लोकल फेऱ्या तसेच पनवेल-बेलापूर -वाशी येथून सकाळी १०.१७ वा. ते दुपारी ३.४७ वा. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईकडे येणाऱ्या अप हार्बर मार्गावरील लोकल फेऱ्या रद्द राहणार आहेत.

या ब्लॉक कालावधीत प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कुर्ला तसेच पनवेल-वाशी भागात विशेष उपनगरीय लोकल फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉक कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वा. या वेळेत ठाणे-वाशी आणि नेरूळ स्थानकांदरम्यान प्रवास करण्याची अनुमती देण्यात आली आहे.

## चार दिवसांवर लग्न; अपघातात एकुलत्या एक लेकाचा करुण अंत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, चांदवड :** चांदवड-निफाड मार्गावर गणूर ते परसूल गावादरम्यान गुरुवारी (दि. २९) दुपारी दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन तरुण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात दोन्ही दुचाकींचा चक्काचूर झाला होता.

**नेमकं काय घडलं?**

प्रसाद विनायक शिंदे (वय २२, रा. देवरगाव) व गणेश बंडू बर्डे (वय २३ रा. आसरखेडे) अशी मृतांची नावे आहेत. संकेत अरुण ठाकरे (वय २१, रा. गणूर), आदित्य अण्णासाहेब शिंदे (वय २२, रा. देवरगाव), बाळू सखाराम गोधडे (वय २१ रा. गोईपुल चांदवड) अशी जखमी तरुणांची नावे आहेत. जखमींना १०८ रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. अधिक उपचारासाठी संकेत ठाकरे याला पिपळगाव बसवंत येथे हलविण्यात आले. तर इतर दोघांना चांदवड येथील सुविधा हॉस्पिटल हलविण्यात आले. पोलिस निरीक्षक कैलास वाघ घटनास्थळी दाखल झाले होते.

**चार-पाच दिवसांत होणार होता विवाह...**

प्रसाद व आदित्य हे दोघे सख्खे चुलत भाऊ चांदवड येथील महाविद्यालयात शिक्षण घेतात. महाविद्यालयाची सुट्टी झाल्याने दोघे दुचाकीवर घरी जात होते. गणेश बर्डे व बाळू गोधडे हे वीटभट्टीवर काम करतात. विटांची गाडी भरून जेवणाचा डब्बा घेण्यासाठी ते निघाले होते.

यावेळी हा भीषण अपघात घडला. मृत प्रसाद शिंदे आणि गणेश बर्डे हे त्यांच्या पालकांचे एकुलते एक मुलगे होते. गणेशचा चार ते पाच दिवसांत विवाह होणार होता. या दुर्घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## चंद्रपूरमध्ये वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात नवीन वर्षाच्या पहिल्याच जानेवारी महिन्यात मानव-वन्यजीव संघर्षाचे ३ बळी गेले. यामध्ये २ वाघ चर १ बिबट्याच्या हल्ल्यात बळी गेला. ३० जानेवारीला चंद्रपूर तालुक्यातील ताडोबा जंगलालगतच्या चोरगाव मधील ६५ वर्षीय शेतकरी उध्दव वारलूजी मोहुर्ले हे नेहमीप्रमाणे शेतात गेले होते यावेळी दबा धरुन बसलेल्या वाघाने मोहुर्ले यांच्यावर हल्ला करीत ठार केले.



शेतकरी उध्दव मोहुर्ले हे ३० जानेवारीला १२ वाजता वरवट चोरगाव मार्गावरील शेतात कामासाठी गेले होते. रोज दुपारी १२ वाजता शेतीवर जाणे व सायंकाळी ७ वाजेपर्यंत घरी परतणे असा त्यांचा नित्यक्रम होता. सायंकाळी मोहुर्ले हे घरी न आल्याने कुटुंबानी त्यांची शोधाशोध केली. मात्र त्यांचा कुठेच शोध लागला नाही. सकाळी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी शोधमोहीम राबविली असता कंपार्टमेंट ५८५ मध्ये उध्दव मोहुर्ले यांचा छिन्नविछिन्न अवस्थेत मृतदेह आढळला. उत्तरीय तपासणीसाठी शेचकरी मोहुर्ले यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. आपल्या शेतातील कामे करण्यासाठी जाणे धोकादायक बनले असून वमविभागाने तात्काळ त्या वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# महाराष्ट्राने ‘कामाचा माणूस’ गमावला !



राजकारण लय वंगाळ आहे. जमिनीचे पैसे आले असतील तर राजकारणात पडू नका. धंदा-पाणी करा, मस्तपैकी राहा, मुलाबाळांना चांगलं शिकवा आणि निर्व्यसनी जीवन जगा. एका ठिकाणच्या सभेतील भाषणात स्व. अजितदादा पवार असे म्हणत असल्याचा व्हिडीओ त्यांच्या मृत्युपश्चात सोशल मीडियावरून प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. तसं पाहिलं तर अजितदादा हे मोकळ्या-ढोकळ्या स्वभावाचे आणि रांगड्या जीवनशैलीत वाढलेले नेते होते. ओठात एक आणि पोटात एक असं त्यांचं अजिबात नव्हतं. जे वाटेल ते ते रोखठोक शब्दांत बोलून मोकळे व्हायचे. त्यांची कार्यशैली अत्यंत प्रभावी होती. सकाळी लवकर कामाला सुरुवात करून ते नेहमीच इतर राजकीय नेत्यांपेक्षा दोन पावले पुढे असायचे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची मजबूत चौकट त्यांच्या कृतीतून स्पष्टपणे दिसून येत होती. त्यांनी कधीही जाती-पातीचे, धर्माचे किंवा विद्वेषाचे राजकारण केलं नाही. आपल्या कामाच्या जोरावरच ते लोकांकडे मत मागायचे. झपाटल्यासारखं काम करणाऱ्या या माणसाने राजकारणातील सर्व चढ-उतार अनुभवले होते.महानगरपालिका निवडणुकांनंतर राज ठाकरे यांनी लवचिक राजकारण हा शब्दप्रयोग केला होता. मात्र अजितदादा याच मार्गाने मागील काही वर्षांपासून चालत होते. मध्यम मार्ग राजकारणात यशस्वी ठरतो, हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध करून दाखवलं होतं.

सत्ता मिळाली की डावे जरा उजवीकडे सरकतात आणि उजवे प्रत्यक्ष डावीकडची धोरणं राबवतात, असं मागील आठवड्यात वाचनात आलं होतं. अजितदादांनी हे जवळून पाहिलं आणि अनुभवलं होतं. अजितदादांचं राजकारण, समाजकारण आणि एकूणच जीवन सर्वसमावेशक होतं. माणसं जोडताना त्यांच्या कार्यकर्तृत्वाला पूर्ण वाव देण्याचं काम दादांनी केलं. राजकारणातील गोड अनुभवांपेक्षा अधिक कडू अनुभव पचवलेल्या दादांनी राजकारण लय वंगाळ आहे असं सांगणं म्हणजे अनुभवातून उमटलेले शब्दच होते. ज्यांची मानसिक, बौद्धिक आणि वैचारिक बैठक मजबूत आहे, त्यांनी राजकारणात जरूर उतरावं. परंतु पुरेशी प्रगल्भता नसलेल्यांनी राजकारणात येऊन स्वतःचं, पर्यायाने कुटुंबाचं नुकसान करू नये, असंच दादांना सांगायचं होतं. राजकारणात येऊन जनतेचे प्रश्न सोडवण्यावर भर दिला पाहिजे. आर्थिक भरभराट, सत्तावलय, प्रसिद्धी, लोकप्रियता याला भाळून कोणीही राजकारणात येऊ नयेअसा दादांच्या सांगण्यामागचा अंतरिक हेतू होता.दादांनी राजकारणात घेतलेले अनेक निर्णय कमालीचे विस्मयकारक होते. स्वतःच्या अंतरात्म्याला विचारून घेतलेले निर्णय असल्यामुळे ते तडीस नेताना त्यांची खंबीरता अखंडित राहत होती. शरदचंद्र पवार या राजकारणातील मोठ्या वटवृक्षाखाली वाढलेल्या दादांनी स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व, वलय आणि कार्यकर्त्यांचं टिकाऊ जाळ निर्माण केलं होतं.

अलीकडच्या काळात दादा खूपच मिश्किल झाले होते. त्यामुळे त्यांचा वेगळा चाहता वर्ग तयार झाला होता. ग्रामीण बाज असलेलं त्यांचं बोलणं ऐकणाऱ्या-पाहणाऱ्यांच्या थेट हृदयाला भिडत होतं. फार विचार करून शब्द निवड न करता ते रोजच्या सामान्य माणसाच्या बोलीत बोलायचे.

कामाचा माणूस हे बिरूद दादांना लोकांनी चिकटवलं, ते त्यांच्या कामाच्या झपाट्यामुळेच. कोविड काळातसुद्धा राज्याची आर्थिक घडी विस्कटू न देण्याची किमया त्यांनी केली. आपण भलं आणि आपलं काम भलं असं म्हणत नाकासमोर चालणारे ते राजकारणी होते.

असं हे, राजकारणात अभावाने आढळणारं, सज्जन, सोज्वळ, सदाबहार, दिलखुलास आणि उमदं नेतृत्व आज महाराष्ट्राने गमावलं आहे. ही खरंच महाराष्ट्राची फार मोठी हानी आहे, यात शंका नाही. पस्तीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेला, अवघा महाराष्ट्र उभा-आडवा समजून घेतलेला, प्रशासनावर मजबूत पकड असलेला, सर्वमान्य, धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी नेता राजकारणाला वंगाळ म्हणतो हे जरी खरं असलं, तरी याच राजकारणातून समाजात आमूलाग्र बदल घडवता येतो, हे दादांनी स्वतःच्या कर्तृत्वातून दाखवून दिलं होतं.

आज दादा आपल्यात नाहीत, ही फार मोठी आणि न भरून येणारी पोकळी आहे. राजकारण वंगाळ होऊ न देण्यासाठी पुढील काळात महाराष्ट्रातील तमाम नेते, कार्यकर्ते आणि सामान्य जनतेने झटणंहीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल.

जोपर्यंत माझे हात-पाय हालतात, तोपर्यंत तुमचं भलं करेन. मी काम करून दाखवेन, कारण मी कामाचा माणूस आहे! होय, मी कामाचाच माणूस आहे! असं ठामपणे म्हणणारा, संकल्प, निष्ठा, कर्म ` हाच माझा धर्म, असं मानणारा जिवाभावाचा माणूस आज आपल्यातून निघून गेला आहे. दादांच्या जाण्याने अवघ्या महाराष्ट्राने आपल्या घरातला हक्काचा ‘कामाचा माणूस’ गमावला आहे

**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

## पहिली महिला अंतराळवीर



आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. २३ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीलप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर कॉंग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# वैयक्तिक अहंकारापेक्षा पक्षहित व सामान्य माणसांना प्राधान्य देणारा ‘धुरंधर’ नेता हरपला..!!

अजितदादा पवारांचा देह गुरुवारी अनंतात विलीन झाला. मृत्यू अटळ असतो; तो देहाला संपवतो, व्यक्तिमत्त्वाला नाही. अजितदादा पवार हे त्याच वर्गातले व्यक्तिमत्त्व होते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची, विचारांची धार आणि कृतींचा ठसा काळाच्या गर्तेत विरून जाणारा नाही. अजितदादांसारखी माणसं देहाने जातात, पण त्यांच्या गुणांनी समाजमनात कायमचं स्थान मिळवलेलं असतं. दादांमधील सर्वात आधी जाणवणारा गुण म्हणजे निर्भीडपणा. परिस्थिती कितीही प्रतिकूल असो, मत कितीही विवादास्पद ठरणारं असो, त्यांनी स्पष्ट भूमिका मांडण्याचा मार्ग कधी सोडला नाही. राजकारणातील गोलमोल भाषा आणि सुरक्षित अंतर ठेवण्याची सवय त्यांनी अंगीकारली नाही. जे वाटलं ते बोलण्याचं आणि जे योग्य वाटलं ते करण्याचं धाडस त्यांनी आयुष्यभर जपलं. हा निर्भीडपणा अनंतात विलीन होणारा नाही; तो पुढच्या पिढ्यांसाठी धैर्याचा मापदंड ठरतो. त्यांच्यातील दुसरा अविनाशी गुण म्हणजे कामाचा प्रचंड आग्रह. आश्वासनं देणं सोपं असतं, पण ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लागणारी चिकाटी दुर्मीळ असते. अजितदादांनी कामाला शब्दांपेक्षा वरचं स्थान दिलं. योजना कागदावरच थांबू नयेत, त्यांनी जनतेच्या जीवनात बदल घडावा, ही त्यांची ठाम भूमिका होती. निर्णय घेतल्यानंतर त्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी ठेवणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती.

सामान्य माणसाशी असलेली त्यांची नाळ हादेखील अनंतात न विलीन होणारा गुण आहे. ते लोकांमध्ये वावरले, त्यांची भाषा ऐकली आणि त्यांच्या प्रश्नांकडे मनापासून पाहिलं. औपचारिकतेपेक्षा आपुलकी आणि दिखाव्यापेक्षा प्रामाणिकपणा यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच ते 'आपला माणूस' म्हणून अनेकांच्या मनात घर करून राहिले. चुका मान्य करण्याची तयारी आणि त्यातून शिकण्याची वृत्ती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू होता. परिपूर्णतेचा आव आणण्यापेक्षा आत्मपरीक्षणावर त्यांनी भर दिला. ही प्रामाणिकता आजच्या सार्वजनिक जीवनात दुर्मिळ होत चालली असली, तरी दादांच्या कार्यातून ती कायम स्मरणात राहील. अजितदादा पवारांचा देह अनंतात विलीन झाला असला, तरी त्यांचा निर्भीडपणा, कामावरील निष्ठा, स्पष्टवक्तेपणा आणि सामान्य माणसाशी असलेली नाळ अनंतात कधीच विलीन होऊ शकत नाही. हे गुण काळाच्या प्रवाहात अधिक ठळक होत जातील आणि समाजाला दिशा देणाऱ्या मूल्यांसारखे सदैव जिवंत राहतील. खरं तर, मृत्यू माणसाला थांबवतो; त्याच्या आयुष्याकडे पाहण्याचा हक्क मात्र जे जिवंत आहेत, त्यांच्या हाती सोपवतो. अशा वेळी केवळ गुणांची उजळणी करून थांबणं पुरेसं ठरत नाही. माणूस मोठा ठरतो तो आपल्या चुका ओळखून, त्या मागे टाकण्याची समाजाची तयारी किती आहे यावर. म्हणूनच आता अजित पवारांनी केलेल्या चुकाही अनंतात विलीन होणं गरजेचं आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील फूट ही त्यांच्या राजकीय आयुष्यातील सर्वात मोठी चूक मानली जाते. ही फूट पक्षातील होतीच; शिवाय ती एका विचारपरंपरेची, विश्वासाची आणि शरद पवारांनी उभ्या केलेल्या राजकीय संस्कृतीची होती.




सत्येच्या गणितात घेतलेला तो निर्णय क्षणिक राजकीय लाभ देणारा ठरला असला, तरी दीर्घकाळात पक्षाला, कार्यकर्त्यांना आणि राज्याच्या राजकारणाला खोल जखम देणारा ठरला. याची जाणीव स्वतः दादांनाही शेवटच्या टप्प्यात होत गेली होती. त्याचीच साक्ष म्हणजे मृत्यूच्या काही दिवस आधी महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी पुन्हा एकदा शरद पवारांचे बोट धरत सुरू केलेला नवा अध्याय. तो अध्याय म्हणजे व्यापक राजकीय संकेत होते. तुटलेली नाळ जोडण्याची, दुभंगलेली मने एकत्र आणण्याची आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसला पुन्हा तिच्या मूळ विचारधारेत उभं करण्याची ती ठाम सुरुवात होती. राज्याच्या राजकारणातही हा बदल दिसावा, अशी अनेक जुन्या जाणत्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची इच्छा होती. पडद्यामागे प्रयत्न सुरू होते, संवादाचे धागे पुन्हा गुंफले जात होते.



मतभेदांपेक्षा मोठा पक्ष आणि व्यक्तींपेक्षा मोठी परंपरा जपण्याची तयारी हळूहळू आकार घेत होती. मात्र दादांच्या अचानक जाण्याने ही प्रक्रिया मध्येच थांबली. इच्छा अपूर्ण राहिली आणि त्या अपूर्णतेची जाणीव आज अधिक तीव्रतेने बोचत आहे. पण मृत्यूने एखादी प्रक्रिया थांबते, दिशा नाही. अजित पवारांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढण्याचा मार्ग म्हणजे त्यांनी केलेल्या चुका दुरुस्त करणं. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणं, कटुता मागे टाकणं आणि पक्षाला पुन्हा संघटित बळ देणं, हीच त्या चुकांच्या विलीनीकरणाची खरी सुरुवात ठरू शकते. दादांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल, तर त्यांच्या नावावर राजकीय भांडवल उभारण्यापेक्षा त्यांनी अखेरच्या काळात दाखवलेल्या समजूतदारपणाला पुढे नेणं गरजेचं आहे. एकत्र येऊन राष्ट्रवादीला पुन्हा उभं करणं, शरद पवारांनी रुजवलेली मूल्यं आणि संघर्षाची परंपरा जपणं आणि वैयक्तिक अहंकारापेक्षा पक्षहित व सामान्य माणसांना प्राधान्य देणं हीच ती वाट आहे, जी अजित पवारांच्या आयुष्याच्या अखेरच्या अध्यायाशी प्रामाणिक ठरेल. तेव्हाच म्हणता येईल की देहाबरोबर चुकाही विलीन झाल्या...

**भावपूर्ण श्रद्धांजली दादा..!!**

## धीर धरा..

पक्षप्रवेशा घाई नसे
अंमळसा धीर धरा
वेळ उचित साधावी
प्रार्थना करा श्रीधरा

चटावे चव चाखायां
सत्तेची धुंदवे मदिरा
विचलित करा चित्त
भुकाग्नि जळे उदरा

प्रवेश त्यांचे लांबवा
अस्वस्थ व्हावा जरा
निर्ढावतीलं पूर्णपणे
जरी स्वभावलाजरा

स्पर्श पुसटसाव्हावा
झुलवत राही गजरा
रंगल्या मैफिलीमध्ये
तेचं करणारं मुजरा

उतावीळ हवी इच्छा
मध चाटवावे अधरा
लोटांगण घाली पूर्ण
झुलवतठेवा अधिरा

शिवून घेऊ मापाचा
आपलेरंगाचा सदरा
मिडीयासमोर द्यावा
प्रति पक्षाला हादरा

एकामागूनकैकजण
रे चढूनयेणारं दादरा
तिकडेजरी गुन्हेगार
आपल्यापक्षा सुधरा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अहिल्यानगर जिल्ह्यात ८६६ ग्रामपंचायतींवर प्रशासक राज

### राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका ६ महिने लांबणीवर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. मात्र, उर्वरित जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने प्रलंबित आहेत. यामुळे या निवडणुका झाल्याशिवाय मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणूका होणे शक्य नाही. यामुळे मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे आदेश राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाने काढले आहेत. यात नगर जिल्ह्यातील ८६६ ग्रामपंचायतींचा समावेश असून यातील ९९ ग्रामपंचायती मागील वर्षीच्या आहेत. चालूवर्षी जानेवारीपासून मुदत संपण्यास सुरुवात होणाऱ्या राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका किमान ६ महिने किंवा वर्षभर लांबणीवर जाणार आहेत. २०२६ मध्ये राज्यातील १४ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींच्या मुदत संपणार आहेत. यात नगर जिल्ह्यातील चालू वर्षीच्या ७६७ ग्रामपंचायती असून यातील ज्यांच्या मुदत जसजशी संपेल तसतशी त्या ठिकाणी प्रशासक राज लागू होणार आहे. नगर जिल्ह्यात २०२५ मध्ये मुदत संपलेल्या ९९ ग्रामपंचायती असून त्या ठिकाणी सध्या प्रशासक राज अस्तित्वात आहे. दरम्यान, नव्याने मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबतचे आदेश ग्रामविकास विभागाचे अपर सचिव बाबुराव सोलसे यांनी काढले आले असून त्यानुसार जिल्हापरिषद मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत. १४ ऑगस्ट २०२० च्या शासन आदेशानुसार प्रशासकाची नियुक्ती केली जाणार आहे. राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये नाशिक विभागात २ हजार ४७६ ग्रामपंचायतीचा समावेश आहे. याठिकाणी आता प्रशासक राज येणार आहे.

**“अहिल्यानगर जिल्ह्यात प्रशासक राज येणाऱ्या ग्रामपंचायती”**

पारनेर ८८, श्रीगोंदा ५९, कर्जत ५६, जामखेड ४७, शेवगाव ४८, पाथर्डी ७८, नेवासा ५९, राहुरी ४४, श्रीरामपूर २७, राहाता २५, कोपरगाव २९, संगमनेर ९४,अकोले ५२ एकूण ७६५ असे आहेत.

## देशातील पहिली वकिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण अकॅडमी नवी मुंबईत



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि३१, नवी मुंबई :** महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या 'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर' (BBATRC) चे कौतुक करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबईत या ऐतिहासिक वास्तूचे लोकार्पण केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी आवर्जून नमूद केले की, ज्याप्रमाणे न्यायमूर्तींसाठी प्रशिक्षण अकॅडमी आहे, त्याप्रमाणे वकिलांसाठी प्रशिक्षण अकॅडमी का नाही, याचे उत्तर आज बार कौन्सिलने दिले आहे.

कायद्याचे शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज (कोर्ट क्राफ्ट) यातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी अत्यंत महत्त्वाची ठरेल. तळोजा येथील या अकॅडमीचे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ॲड. अनिल सी. सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ.मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता ॲड. देविदास पांगम यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, राज्य सरकारने कायदेविषयक प्रशिक्षण आणि संशोधनाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या जागेचा अतिशय उत्तम उपयोग करून अतिशय कमी कालावधीत ही उत्कृष्ट वास्तू उभारली गेली आहे. अकॅडमीच्या इमारतीचे दर्जेदार आणि अल्पावधीत पूर्ण झालेले बांधकाम हे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीची आठवण करून देणारे असल्याचे सांगून त्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

वकिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्याचा निर्णय हा देशातील पहिलाच निर्णय असून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र यांनी घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुक केले. बदलते कायदे, नवीन फौजदारी कायदे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षित वकील आणि अभियोजक तयार करणे आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी अकॅडमीसाठी राज्य शासनाकडून १० कोटी रुपयांचे अनुदान आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वितरित केले जाईल, असेही सांगितले.विस्तारित अर्थव्यवस्थेनुसार तंत्रज्ञानातील बदलांशी अनुरूप आपली यंत्रणा प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. पिटिशन ड्राफ्टिंगसाठी एआय चा उपयोग करताना होणाऱ्या धोक्यांबाबतही सतर्क राहायला हवे. संशोधनाशिवाय गुणवत्ता येत नाही, त्यामुळे हे रिसर्च सेंटर भविष्यात दर्जेदार कायदेविषयक संशोधनाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ वकील तथा BCMG चे अध्यक्ष हर्षद निंबाळकर यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'विधी महर्षी पुरस्कार' न्यायमूर्ती बी.बी. चव्हाण यांना प्रदान करण्यात आला, तर अमरावतीचे दिवाणी वकील ज्ञानेश्वर बावरेकर यांचा मरणोत्तर पुरस्कार त्यांचे पुत्र ॲड. संजय बावरेकर यांनी स्वीकारला.

या सोहळ्याला बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (BCMG) चे उपाध्यक्ष ॲड. जयंत डी. जायभावे, BBATRC चे अध्यक्ष ॲड. डॉ. उदय पी. वारुंजीकर, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (BCI) सदस्य ॲड. आशिष पी. देशमुख आणि समन्वयक व उपाध्यक्ष ॲड. संग्राम डी. देसाई उपस्थित होते. तसेच बार कौन्सिलचे सदस्य ॲड. मोतीसिंह जी. मोहता, ॲड. गजानन बी. चव्हाण, ॲड. मिलिंद एस. पाटील, ॲड.वंसत डी. साळुंखे, ॲड. मिलिंद एस. थोबडे, ॲड.अविनाश जे. भिडे, ॲड. वसंतराव ई. भोसले, ॲड. अनिल एम. गोवर्दिपे, ॲड. विवेकानंद एन.घाटगे, ॲड. आसिफ एस. कुरेशी, ॲड. अविनाश बी. आव्हाड, ॲड. अमोल एस.सावंत, ॲड. अण्णाराव जी. पाटील, ॲड.सतीश ए. देशमुख, सीनिअर ॲड. सुदीप आर. पासबोला, ॲड.सुभाष जे. घाटगे, ॲड.विठ्ठल बी. कोंडे-देशमुख, ॲड.अहमदखान यू. पठाण, ॲड.राजेंद्र बी.उमाप आणि ॲड. पारिजात एम. पांडे यांची ही विशेष उपस्थिती लाभली.

## अजितदादांना श्रद्धांजलीसाठी पारनेरमध्ये सोमवारी सर्वपक्षीय शोकसभा

### आमदार काशिनाथ दाते यांची माहिती



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचा आधारवड, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्वपक्षीय आयोजित करण्यात आलेली सर्वपक्षीय शोकसभा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आली असून ही शोकसभा रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार होती. मात्र, सोमवार, काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आली असून ही शोकसभा सोमवार, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा बँक सभागृह, पारनेर येथेच आयोजित करण्यात आली आलेची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. या शोकसभेसाठी पारनेर तालुक्यातील सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे. तालुक्याच्या राजकीय, सामाजिक व विकासात्मक वाटचालीत अजितदादा पवार यांचे योगदान अविस्मरणीय असून, त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी ही सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## धोत्रे खुर्द शाळेतील 'शेतीमाल विक्री' प्रेरणादायी उपक्रम

### 'नातं मातीशी' कक्षामुळे शाळा ठरतेय ग्रामविकासाचे केंद्र; शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून कौतुक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रे खुर्द येथे शिक्षकांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'मातीशी नातं' या नाविन्यपूर्ण उपक्रमाने शिक्षण क्षेत्रासह ग्रामविकासातही नवा आदर्श निर्माण केला आहे. या उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात स्वतंत्र 'मातीशी नातं' कक्षाची स्थापना करण्यात आली असून, गावात उत्पादित होणारा शेतीमाल व कडधान्ये थेट विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या अभिनव उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ मिळत असून, स्थानिक व सेंद्रीय उत्पादनांना चालना मिळत आहे. शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता ग्रामविकास व आत्मनिर्भरतेचे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे चित्र या उपक्रमातून दिसून येत आहे.

या उपक्रमाची दखल घेत राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शाळेतील शिक्षक सचिन ठाणगे व नंदा चेमटे यांचे विशेष कौतुक केले. शाळा आणि गाव यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा हा उपक्रम असून, तो राज्यातील इतर शाळांसाठी आदर्श ठरेल, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शेती, कडधान्य उत्पादन, विक्री प्रक्रिया तसेच आर्थिक व्यवहार यांचे प्रत्यक्ष व व्यवहार्य ज्ञान मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृती, आत्मनिर्भरतेची भावना आणि सामाजिक जबाबदारी अधिक बळकट होत आहे. शाळेमध्ये गावात तयार होणारा सेंद्रीय भाजीपाला, गावरान कडधान्ये, ज्वारी, बाजरी, गहू, लोकर, घोंगडी आदी शेतीमाल बाजारपेठेच्या तुलनेत कमी दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमाला शेतकरी, पालक व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, शाळेला गावाची आणि गावाला शाळेची मदत मिळत असल्याने हा उपक्रम 'स्थानिक ते राष्ट्रीय' या संकल्पनेला साकार करणारा असून, राज्यातील इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असे मत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी व्यक्त केले. एकूणच 'मातीशी नातं' या उपक्रमामुळे शिक्षण, शेती आणि ग्रामविकास यांचा सुंदर संगम साधला जात असून, धोत्रे खुर्दची जि.प.शाळा राज्यासाठी एक आदर्श नमुना ठरत आहे.

## महापौर व उपमहापौर निवडीसाठी पहिली विशेष सभा १० फेब्रुवारी रोजी




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका महापौर व उपमहापौर निवडीसाठी मा. नागपूर विभागीय आयुक्त यांनी निश्चित केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्यांची पहिली विशेष सभा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी मनपा राणी हिराई सभागृहात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.नागपूर विभागीय आयुक्त यांनी निश्चित केल्यानुसार चंद्कपूर मनपाच्या महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणुकीची विशेष सभा पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी व्नय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यानुसार निवडणुकीचा पुढील कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. ज्यामध्ये महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील दुसऱ्या माळ्यावर नगरसचिव यांच्या कक्षात नामनिर्देशन पत्र मिळणार असून याच ठिकाणी गुरुवार ५ फेब्रुवारी या तारखेस सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारले जाणार आहेत.

**विशेष सभा सुरु झाल्यावर छाननी**

दिनांक १० फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता राणी हिराई सभागृहात विशेष सभा आयोजित केली आहे. पिठासीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली या सभेमध्ये नामनिर्देशन पत्राची छाननी होणार आहे. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे पिठासीन अधिकारी हे घोषित करतील. यानंतर पंधरा मिनीटाच्या कालावधीत लेखी नोटीस देऊन उमेदवारी मागे घेता येणार आहे व त्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे घोषित करुन हातवर करुन मतांची नोंद घेण्यात येणार आहे. उक्त प्रक्रियेनंतर पिठासीन अधिकारी निवडणूक निर्णयाची घोषणा करतील.

**स्वत: ला दाखल करावे लागणार नामनिर्देशन**

नामनिर्देशन पत्र, ओळखपत्राची सत्यपत्र निवडणूक लढविणाऱ्या निर्वाचित पालिका सदस्य यांना स्वत: दाखल करावी लागणार आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी प्रत्येक उमेदवारास चारपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार नाहीत. या पदासाठी कोणत्याही पालिका सदस्यास एकापेक्षा अधिक उमेदवाराची नामनिर्देशन पत्रे सूचित करता येणार नाहीत किंवा त्यास अनुमोदनही देता येणार नाही.

## भानेगावात संत शिरोमणी गुरू रविदास महाराज जयंतीचा उत्साह

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** सावनेर तालुक्यातील भानेगाव येथे 'श्री संत रविदास मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास संस्थेच्या' वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात येत आहे. यानिमित्त दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर भक्तीमय झाला आहे.

अभिषेक व कलश स्थापना, उत्सवाचा प्रारंभ शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात झाला. सकाळी विधिवत अभिषेक व कलश स्थापना करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी 'जागृत भजनाचा' कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठ्ठल-रखुमाई आणि संत रविदास महाराजांच्या जयघोषात सहभाग नोंदवला. रविवार, दिनांक ० १ फेब्रुवारी २०२६ रोजी मुख्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सकाळी १० वाजता श्री संत रविदास महाराजांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येईल. यात गावातील भजनी मंडळी व भाविक सहभागी होतील. दुपारी १ वाजता पालखीचे आगमन झाल्यावर दहीकाल्याचा कार्यक्रम पार पडेल. दुपारी दीड पासून दहीकाल्यांनंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत शिरोमणी रविदास महाराज मंदिर भानेगावच्या वतीने करण्यात आले आहे.

## एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये - आयुक्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** मनपा आरोग्य विभागाचे कामकाज व्यवस्थितरित्या सुर आहे. सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लसीकरण सत्रांना नियमित भेटी द्याव्या. तसेच ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यादृष्टीने आरोग्य विभागाने प्रयत्न करण्याचे निर्देश मनपा आयुक्त अकुनूरी नरेश यांनी दिले. सिटी टास्क फोर्स समितीची आढावा बैठक गुकुवारी मनपा सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते माहिती देत होते. डॉ.अश्विनी भारत यांनी नियमित लसीकरण सत्राच्या आयोजनाचे पॉवर पॉईंट द्वारा सादरीकरण केले. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शहरातील बालकांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी नियमित लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवली जाते. मुलांमध्ये लसीकरणाद्वारे प्रतिबंधित होणाऱ्या आजारांपासून संरक्षण मिळावे, यासाठी ही महत्वाची आरोग्यसेवा पुरवली जात आहे. या मोहिमेचा मासिक आढावा आयुक्ताद्वारे घेतला जातो.

## एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचे उद्घाटन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे समाजाशी प्रत्यक्ष जुळून घेण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन ॲड.निलेश चोरे यांनी केले. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, बल्लारपूर आवार (महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल) यांच्या तर्फे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे शिबिर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, विसापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. 'पाणलोट क्षेत्र विकासाद्वारे शाश्वत विकास व पर्यावरण संवर्धन' या संकल्पनेवर आधारित हे ७ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिर २८ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी या कालावधीत विसापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे उद्घाटन दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी ॲड. निलेश चोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराअंतर्गत विसापूर परिसरात विविध सामाजिक, पर्यावरणपूरक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ.राजेश इंगोले होते.

यावेळी व्यासपीठावर उद्घाटक ॲड.निलेश चोरे, आवाराचे समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त, कार्यक्रम अधिकारी शुतिका राऊत, तसेच दीपिका उमरे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना ॲड.निलेश चोरे म्हणाले की, मोबाईल फोनच्या वाढत्या वापरामुळे माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिरे विद्यार्थ्यांना समाजाशी प्रत्यक्ष जोडून घेण्याची महत्त्वपूर्ण संधी देतात. जनमाध्यमांचा उपयोग काळाची गरज असली तरी आपल्या आजूबाजूच्या लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे तितकेच आवश्यक आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजेश इंगोले यांनी विद्यार्थिनींना समाजाचा एक घटक म्हणून आपली कर्तव्ये ओळखून ती प्रामाणिकपणे पार पाडण्याचे व योग्य आदर्श निवडण्याचे आवाहन केले. डॉ. वेदानंद अलमस्त यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक संबंध यांमध्ये समतोल कसा साधावा यावर मार्गदर्शन करत या शिबिरातून विद्यार्थिनींना नवे अनुभव व ज्ञान मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रम अधिकारी शुतिका राऊत यांनी प्रास्ताविकातून सात दिवसीय शिबिराच्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन सहप्राध्यापिका अपेक्षा पिंपळे यांनी केले तर सहायक कार्यक्रम अधिकारी दीपिका उमरे यांनी आभार मानले. याप्रसंगी सहायक प्राध्यापक तोयेश नागपुरे, नेहा जिवतोडे तसेच सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# महाविद्यालयातून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडते - प्रा .इंद्रजीत भालेराव

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
**दि.३०, पालम (परभणी) :** महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण आयुष्य घडत असते .उच्च शिक्षणाची गंगा आज ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्यामुळे अनेक वंचित घटकातील विद्यार्थ्यांना आपले स्वयंभू आयुष्य घडवता आले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. हीच परंपरा माधवराव पाटील महाविद्यालय राबवीत आहे असे गौरवोद्गार प्रसिद्ध कवी प्रा.इंद्रजीत भालेराव यांनी आज बुधवारी (ता.२८) रोजी केले. ते शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आत्माराम




आरसुळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बळीराजा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तुषार भैय्या गोळेगावकर, उपाध्यक्ष योगेश गोळेगावकर, माजी प्राचार्य डॉ.हरीश सातपुते यांची विचार मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना भालेराव म्हणाले शिक्षण हे माणसाला संपन्न करत असल्यामुळे आज विविध माध्यमे शिक्षण देण्याचे काम करत आहेत पण प्रत्यक्ष वर्गातील शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते त्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेतलेच पाहिजे असे ठणकावून सांगताना त्यांनी त्यांच्या लोकप्रिय कवितांचे गायन सुद्धा केले .यावेळी तुषार गोळेगावकर यांच्यासह महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्ष समारोप करताना डॉ. आरसुळे यांनी विद्यार्थ्यांसमोरचे वर्तमान काळातील विविध आव्हानांचा आढावा घेत शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीश सातपुते यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय बालाघाटे यांनी तर आभार डॉ. घनश्याम पांचाळ यांनी मानले.

यावेळी माजी विद्यार्थी व पालक यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी समितीने परिश्रम घेतले.

# पालम नगरपंचायतीच्या विविध विषय समिती सभापतीपदीच्या निवडी जाहीर




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
**दि.३१, पालम (परभणी) :** परभणी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पालम नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांच्या सभापतीपदासाठीची निवडणूक प्रक्रिया शुक्रवार, दि.३० जानेवारी रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नगरपंचायत कार्यालयातील कै. दासराव भाऊ शिरस्कर सभागृहात झालेल्या विशेष सभेत नगरपंचायतीच्या सर्व पाचही समित्यांच्या सभापतींची बिनविरोध निवड करण्यात आली.

ही निवडणूक प्रक्रिया जिल्हा सहायक आयुक्त महेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी युवराज पौळ यांच्या उपस्थितीत पार पडली. जिल्हाधिकाऱ्यांनी दि.२७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार ही विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. नवनिर्वाचित सभापतींमध्ये स्थायी समिती च्या सभापती पदी अनवरीबी हिदायतुल्लाखा पठाण, सार्वजनिक बांधकाम, नियोजन व विकास समिती सभापती पदी गजानन आबासाहेब पवार, स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती समिती सभापती पदी

भास्कर गंगाराम शिरस्कर, महिला व बालकल्याण समिती सभापती पदी रजिया बेगम सय्यद इफ्तेखार सय्यद, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती संजय रामराव थिट्टे यांची निवड करण्यात आली.

सर्व समित्यांचे सभापती बिनविरोध निवडले गेल्यामुळे पालम शहरातील विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. निवडीनंतर नवनियुक्त सभापतींचे नगरसेवक तसेच नागरिकांकडून अभिनंदन करण्यात आले.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 34 बांधकामांना पनवेल मनपाकडून स्थगिती

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.३१, पनवेल :** उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करून कारवाई करण्यात आली. स्थळपाहणी अहवालानुसार एकूण ३४ बांधकाम स्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आले आहे.

यापूर्वी महापालिकेच्या वतीने एकूण १६९ बांधकाम प्रकल्पांना / स्थळांना उपाययोजना करणेबाबत अथवा काम बंद करणेबाबाबत इशारावजा जाहीर नोटीस देण्यात आलेली होती. संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्यानंतरही काही व्यवसायिकांनी अपेक्षित कार्यवाही न केल्याचे दिसून आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने पुन्हा एकदा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली. तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाणे पाणी न शिंपडणे, वाहन स्वच्छता न करणे, तसेच ब्लास्टिंग करतानाच्या मानक कार्यपद्धती (एसओपी) चे पालन न करणे आदी गंभीर बाबी निर्दर्शनास आल्या.

या अनुषंगाने खालीलप्रमाणे विभागनिहाय कारवाई करण्यात आली ˘

**कळंबोली विभाग – १० बांधकाम प्रकल्प**
**कामोठे विभाग – ०९ बांधकाम प्रकल्प**




**नवीन पनवेल / पनवेल विभाग – १५ बांधकाम प्रकल्प**
**एकूण : ३४ बांधकाम प्रकल्पांवर कारवाई**

सदर कारवाईदरम्यान संबंधितांना तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ हवा व पर्यावरण संरक्षण याबाबत पनवेल महानगरपालिका कटिबद्ध असून, यापुढेही अशा प्रकारच्या तपासण्या व कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**स्थळपाहणी अहवालानुसार बांधकामस्थळांनी पूर्तता न केलेल्या बाबी :**

१) विकासकांनी बांधकाम प्रकल्पांच्या भोवती किमान २५ फूट उंचीचे धातूचे पत्रे लावण्यात आल्याचे दिसून येत नाही.

२) बांधकाम चालू असणाऱ्या सर्व इमारतींच्या भोवती ओल्या हिरव्या कापडाने / ओल्या तागाच्या कापडाने / ताडपत्रीने बंदिस्त करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

३) बांधकामच्या ठिकाणी वॉटर स्प्रिंकलर / स्मॉग गन द्वारे सतत फवारणी करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

४) बांधकाम जागेवरील हवेमध्ये प्रदूषण करणाऱ्या भंगार / पाडकाम साहित्यावर पाणी शिंपडण्यात आल्याचे दिसून येत नाही.

५) बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स काँक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूनी पूर्ण झाकलेली असावीत. वाहनातून कोणत्याही प्रकारे गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, ह्याची दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही.

६) बांधकामाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

७) बांधकामाच्या ठिकाणी सेन्सर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स लावणे बंधनकारक असेल, प्रदूषणाची पातळी ओलांडणार नाही याबाबत उपाययोजना करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

८) बांधकामाच्या ठिकाणी ग्राइंडिंग, कटिंग, ड्रोलिंग, सोईग आणि ट्रिमिंग ची कामे बंदिस्त भागात करावी व हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी पाण्याचे स्प्रिंकलर वापरून सतत फॉगिंग करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

९) बांधकामाच्या ठिकाणी असणारी माती, वाळू, बांधकाम साहित्य हे बंदिस्त भागामध्ये साठविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

# खापरखेड्यातून रामटेक पायी दिंडीचे प्रस्थान ! ठिकठिकाणी उत्साहात स्वागत

**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.३१, नागपूर :** 'श्रीराम जय राम जय जय राम'च्या जयघोषात आणि भक्तीमय वातावरणात खापरखेडा येथून श्रीक्षेत्र रामटेक पायी दिंडी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले. गेल्या ५५ वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेत यंदाही हजारो अबालवृद्ध, महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भानेगाव-खापरखेडा दिंडी समितीच्या वतीने आयोजित या पायी यात्रेला रमेश जैन यांनी हिरवी झेंडी दाखवली. तत्पूर्वी माजी सरपंच रवींद्र चिखले, योगेश जालंदर व त्यांची पत्नी सानू जालंदर यांनी पालखीचे विविधत पूजन केले.

रविदास समितीच्या वतीने मंदिरात आरती करून



भाविकांना उपवासाचा चिवडा वाटण्यात आला. भानेगाव येथील चिकनकर परिवारातर्फे चहा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दिंडीतील भाविकांना मार्गातील सिंगोरी येथील हनुमान मंदिर आणि तामसवाडी येथे ग्रामस्थ व जीवन क्रांती महिला मंडळाच्या वतीने पालखीचे पूजन करून नाश्ता देण्यात आला.

या दिंडीचे खास वैशिष्ट्य म्हणजे यात १० वर्षांच्या मुलांपासून ते ९६ वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्वच उत्साहाने सहभागी झाले होते. विविध गावांतील भजन मंडळांनी गायलेल्या भजनांमुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. भाविकांच्या सोयीसाठी रुग्णवाहिका व इतर चारचाकी वाहनांची व्यवस्थाही दिंडीसोबत करण्यात आली होती. ही दिंडी हिंगणा गंडा मार्गे सायंकाळी रामटेक येथे पोहोचेल.

यशस्वीतेसाठी दिंडी समितीचे अध्यक्ष तुकाराम पेठे, उपाध्यक्ष बालाजी हांडे, सचिव प्रमाण ढोबले, राजू वांढे, सुरेश सूर्यवंशी, साद, दीपक जालिंदर, विजय चिखले, शैलेंद्र मरसकोल्हे, कपिल झलके व इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

# राहुरी शहरात राँग साईड वाहनचालकांवर कडक कारवाई
## ५५ वाहनांवर कारवाई; ३७,१०० रुपयांचा दंड वसूल



**अक्षराज : प्रमोद डफळ**
**दि.३१, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर ते मनमाड या महामार्गाचे काम सुरू असल्याने राहुरी शहरात सध्या एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र काही वाहनचालक नियमांकडे दुर्लक्ष करून राँग साईडने वाहने चालवत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागामार्फत आज विशेष कारवाई करण्यात आली.

या कारवाईत राँग साईडने वाहन चालवणाऱ्या एकूण ५५ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करत तब्बल ३७,१०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. राँग साईडने वाहने आणल्यामुळे वाहतूक पूर्णतः जाम होत असून याचा त्रास सामान्य नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे पोलिसांनी नमूद केले.

यावेळी नागरिकांना आवाहन करण्यात आले की, सर्व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, आपली वाहने एकेरी लेनमध्येच चालवावीत व राँग साईडने वाहन चालवू नये. नियमांचे उल्लंघन केल्यास यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा राहुरी पोलीस स्टेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. सोमनाथ घारगे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, सोमनाथ वाकचौरे, अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, तसेच जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड तसेच पोलीस हवालदार ठोंबरे व दरेकर यांनी केली.

# इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न




**अक्षराज : प्रतिनिधी वृत्तसंकलन**
**दि.३०, बुलडाणा :** आज दिनांक ३१ जानेवारी२०२६ रोजी श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, बुलढाणा येथे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रमोद कावरे, विज्ञान विभाग प्रमुख योगेश भोंडे, एच.एस.व्ही.सी. विभाग प्रमुख पंढरीनाथ वाघ, डी.के. पाटील, संदीप पाटील हे उपस्थित होते. यावेळी इयत्ता बारावीच्या काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

त्यांनी शाळेतील त्यांच्या गोड आठवणी सांगितल्या. शिक्षका विषयीचा अनुभव विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. यानंतर डी. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे कसे जावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्री कावरे यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे गेले पाहिजे, तसेच परीक्षेला आत्मविश्वासाने आणि निर्भीडपणे सामोरे गेले पाहिजे, तसेच अभ्यासात सातत्य नेहमी ठेवल्यास भविष्यात आपले जीवन नक्कीच कसे घडते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मते मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. वाघ मॅडम यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# विंचूर येथे शोकसभा :अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.३१, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात झालेल्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण राज्यासह शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, विंचूर येथे भव्य शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. **राजकीय व शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी :** २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या या दुर्दैवी घटनेमुळे रयत शिक्षण संस्थेचे आणि महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान झाले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. शोकसभेत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या.

**मान्यवरांनी व्यक्त केले मनोगत :** यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ, लासलगाव बाजार समितीच्या सभापती सुवर्णा जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, माजी सभापती विलास गोरे, आणि प्राचार्य एन. ई. देवढे यांनी आपल्या मनोगतातून अजितदादांच्या कार्याचा गौरव केला. दादांच्या शिस्तीचा आणि विकासात्मक दृष्टीकोनाचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे मत यावेळी मांडण्यात आले. श्रद्धांजली अर्पण करणाऱ्यांमध्ये डॉ. श्रीकांत आवारे, किशोर पाटील, कैलास सोनवणे, शिवा आप्पा सुरासे, ज्ञानेश्वर तासकर, त्र्यंबक चव्हाणके, जे. एन. ठाकरे, डी. आर. गायकवाड आणि आर. के. चांदे यांचा समावेश होता.

**ग्रामस्थ व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती :** या शोकसभेस विंचूरचे सरपंच सचिन दरेकर, डॉ. काकासाहेब तासकर, एकनाथ शिंदे, पंढरीनाथ दरेकर, राजाभाऊ गोरे यांसह विंचूर, रुई, वनसगाव, टाकळी विंचूर आणि चांदोरी परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.